**फेबुवॉल**

ओठ घट्टं बंद ठेव
पण वरवर अस्फुट
हसु पण ठेव
कारण तेच
निदान
लक्ष तरी
वेधून घेतं !
तुझी
पडझड
धडपड
तडफड
आतली घुसमट
आणि उद्रेक सुद्धा
व्यक्त केलासच कधी
तर ते वाचणारे,
आत झिरपून देत
समजून घेणारे,
दोन दर्दी डोळे मिळायला
पदरी फार फार पुण्य
असावं लागतं -
या
झटपट likes च्या
जमान्यात..

©**प्रीती देशपांडे**